**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती  सभा क्रमांक : ५**

नगरसचिव कार्यालय

दिनांक :-४/८/२०१४

प्रति,

मा. ------------------------------------

स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती **सभा क्र -५ बुधवार दि. ६/८/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-

प्र. नगरसचिव,

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

अहमदनगर महानगरपालिका.

**बुधवार  दिनांक- ६/८/२०१४ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ४५ | श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची अहमनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक या पदावर कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरिता मानधनावरील केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४६ | मा.स्थायी समिती ठराव क्र.३ दि.२/६/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे अमरधाम कंपौड लगत गाळा क्र.१५ लगची खुली जागा क्र.१४ वर खुल्या जमिनीचे क्षेत्र १०x१४=१४० चौ. फुट खुली जागा अर्जदार श्री. अजय भिमराज चितळे यांचेऐवजी त्यांचे वडील श्री. भिमराज आनंदाराव चितळे यांना १ वर्षे भाडेकराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन देणेबाबत फेरसादर. |
| ४७ | मा.स्थायी समिती ठराव क्र.४३ दि.८/७/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं. ३४ पैकी येथील कचरा डेपो या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्तीबाबत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

सही /-

प्र.नगरसचिव,

अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** विषय क्रमांक- ४५ ते ४७ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-५**

विषय क्रमांक- ४५ बुधवार दिनांक ६/८/२०१४

ठराव क्रमांक- ४५ बुधवार दिनांक ६/८/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची अहमनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक या पदावर कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरिता मानधनावरील केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

विनंती रिपोर्ट की, प्रा. श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची जा.क्र.आस्था./ कंत्राटी नेमणूक ७७३० दि.१३/२/२०१४ अन्वये दिनांक १७/९/२०१३ पासून सहा महिन्याकरिता दरमहा रूपये २०,०००/- एकत्रीत मुशाहि-यावर अटीस व शर्तीनुसार स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्रासाठी संचालक म्हणून तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करण्यात आलेली असुन सदर नियुक्तीचा कालावधी हा दिनांक १६/३/२०१४ रोजी समाप्त होत आहे.

श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांनी अर्ज देवून "मला केंद्र संचालक पदावर पुनश्च नियुक्ती मिळावी व विनंती अशी की पूर्वलक्ष्मी पध्दतीने सप्टेंबर २०१३ पासून सलग एक वर्षाची नियुक्ती दिल्यास सोईचे होईल " असे नमूद केलेले आहे.

श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची मनपाने चालविलेल्या स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्राच्या स्थापनेपासून (२००७) या केंद्राच्या प्रकल्प संचालकपदी कार्यरत असुन त्यांच्या मागील कार्यकाळात आपल्या केंद्रातील विद्यार्थी विक्रीकर अधिकारी, पी.एस.आय. पदी नियुक्त झालेले असुन महाराष्ट्रात पहिला आलेला विक्रीकर अधिकारी हा आपल्याच केंद्राचाच आहे.

तसेच प्र.प्रसिध्दी अधिकारी यांनी श्री. मिसाळ यांना पुर्ननियुक्ती देणेबाबत खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहेत.

प्रा.श्री.एन.बी. मिसाळ, हे स्पर्धा परिक्षा केंद्राच्या प्रारंभा पासून (२००७ पासून) स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक म्हणुन कार्यरत आहेत. त्यांच्या नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना अतिशय आवश्यक आहे. तरी त्यांची पुनश्च तांत्रिक खंड देवून दि.१९/३/२०१४ पासून नेमणूक करण्यास शिफारस आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

५३:- नेमणूकीचे अधिकार कोणामध्ये निहित असणे

१.महानगरपालिकेच्या ज्या अधिका-यांचे किमान वेतन भत्ते वगळुन चारशे रूपये किंवा त्याहून अधिक आहे मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचाअधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल. परंतु आयुक्ताला भत्ते वगळुन चारशे किंवा त्याहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कर्ज विषयक कामासाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणूका सहा महिन्याहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समिती पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करताना त्या विषयक महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहामहिन्याचा कालावधी संपल्यांनतर मनपाच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणूकीचे नवीकरण करता येणार नाही.

२. पोट कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियत्रंणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत यांची नेमणूक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधिन यथास्थिती , नगरपालिका मुख्यलेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहित

असेल मात्र कोणत्याही विशिष्ठ प्रकरणात किंवा प्रकरणाच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

३. या आधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित असेल.

परंतु कायम नेमणूकाच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल.

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीवाचुन कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहुन अधिक असेल अशा कोणत्या कालावधीसाठी करता येणार नाही आणि भत्ते वगळून शंभर रूपयाहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही असे नमुद केलेले आहे. तसेच श्री. मिसाळ हे सेवानिवृत्त असुन त्यांचे वय ६० वर्षापेक्षा जास्त आहे.

सेवा निवृत्त कर्मचा-यांना / अधिका-यांना पुर्ननियुक्ती / सेवेत मुदत वाढ देण्याबाबत मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.आरईएम १५०९/प्र.क्र.३५ /२००९/१३ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि.१ जून २००९ अन्वये जनहित याचिका क्र.८५/०८ सेवा निवृत्त सेवा निवृत्त शासकीय अधिका-यांना पुर्ननियुक्ती/सेवेत मुदतवाढ देण्यास मा.उच्च न्यायालयाने घातलेल्या निर्बंधाची अंमलबजावणी करणेबाबत आदेश दिलेले असुन आदेशात खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

१.कोणत्याही सेवा निवृत्त झालेल्या शासकीय अधिका-याला मा.उच्च न्यायालयाच्या पुर्व परवानगी शिवाय सेवेत मुदतवाढ देण्यास अथवा पुर्ननियुक्त करण्यास निर्बंध घालण्यात आले असल्याचे सर्व विभागांच्या निदर्शनास आणण्यात आले आहे.

२. याबाबत विधी व न्याय विभागाने कंत्राटी पध्दतीने निवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करण्यापुर्वी मा.उच्च न्यायालयाची पुर्व परवानगी घ्यावी असा सल्ला दिला आहे. विधि व न्याय विभागाचे सदर अभिप्राय विचारात घेता शासन सेवेत कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यास सद्यस्थितीत सामान्य प्रशासन विभागाची मान्यता दिली जाणार नाही याची सर्व प्रशासकीय विभागांनी नोंद घ्यावी.

सदर बाबत तत्कालीन मुख्यलेखा अधिकारी श्री. कर्डीले यांनी दि.२२/२/२०१० रोजीच्या प्रस्तावामध्ये महाराष्ट्र शासन साप्रवि/आरईएम/१५०९/प्र.क्र.३५/२००९/१३ दि.१ जून २००९ नुसार सेवानिवृत्त शासकीय कर्मचा-यास पुनर्नियुक्ती देण्यास मा.उच्च न्यायालयाने निर्बंध घातले आहे. श्री. मिसाळ हे अशासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झाल्याचे दिसुन येते त्यांना कंत्राटी पनध्दतीने एक वर्षासाठी मानधनावर नेमणूक देणे योग्य असा अभिप्राय दिलेला आहे.

श्री.नारायण बाबुराव मिसाळ स्पर्धा परिक्षा केंद्र,संचालक यांची आस्था.जा.क्र.७७३० दि.१३/२/२०१४अन्वये दिनांक १७/९/१३ पासून सहा महिन्याकरिता देण्यात आलेली तात्पुरती नेमणूक हि दि.१६/३/२०१४ रोजी झालेली असुन मागील दिनांक २१/९/२०१३ रोजीचा प्रस्तावानुसार जा.क्र.आस्था. ७७३० दि.१३/२/२०१४ या आदेशान्वये देण्यात आलेली नेमणूक ही कार्योत्तर मंजूरीसाठी मा.स्थायी समिती समोर सादर करण्यात आले. परंतु मा.स्थायी समिती अस्तित्वात आलेली नसल्याने सदर बाबत मा.स्थायी समितीची मंजूरी प्राप्त झालेली नाही.

तरी श्री. नारायण बाबुराव मिसाळ स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक यांची आस्था.जा.क्र.७७३० दि.१३/२/२०१४ अन्वये देण्यात आलेली तात्पुरती नेमणूक हि दिनांक १६/३/२०१४ रोजी समाप्त झालेली असुन मागील दिनांक २१/९/२०१३ रोजी प्रस्तावानुसार जा.क्र.आस्था.७७३० दि.१३/२/१४ या आदेशान्वये देण्यात आलेली नेमणूक ही कार्योत्तर मंजूरीसाठी मा.स्थायी समिती समोर सादर करण्यात आले. परंतू मा.स्थायी समिती अस्तित्वात आलेली नसल्याने सदर बाबत मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झालेली नाही. परंतु उपरोक्त मा. सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील दि.१ जून २००९ रोजीचे पत्राबाबत तत्कालीन मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय व प्र.प्रसिध्दी अधिकारी यांची श्री. मिसाळ यांना पुर्ननियुक्ती देणे बाबतची शिफारस पहाता. तसेच मनपा मार्फत चालविलेले स्पर्धा परिक्षा केंद्र हा एक उत्तम प्रकारचा उपक्रम असुन सदर उपक्रामात खंड पडुन येथील विद्यार्थ्याचे नुकसान लक्ष्यात घेता श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांना तांत्रिक खंड देवून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुद नुसार मनपा मार्फत संचलीत स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्रासाठी संचालक म्हणून दि.१९/३/२०१४ पासून सहा महिन्याकरीता कंत्राटी करार पध्दतीनी तात्पुरत्या स्वरूपात दरमहा रू.२०,०००/- एकत्रीत मुशाहि-यावर नियुक्ती देणेबाबत मुख्य लेखा परिक्षक व मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय घेवुन तसे नियुक्ती आदेश निर्गमित करून प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीसाठी मा. स्थायी समिती पुढे सादर करणे उचित वाटते. तथापी आदेशार्थ सादर.**/अ**

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्र.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, मु.ले.अ. / मु.ले.प. यांचा अभिप्राय घेणे.

यावर मुख्यलेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्ताव मान्य आदेशार्थ

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, **अ** प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत **"अ"** नुसार मान्यतेस्तव मा.स्थायी समितीसभेपुढे प्रस्ताव सादर करणेस हरकत नाही मे. आदेशार्थ सादर.

यावर आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावीत **"अ"** नुसार मान्य मा. स्थायी समिती सादर करणे

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- मागील सभेत पाणीपट्टी व घरपट्टी निर्लेखित करावयाची प्रकरणे एकत्रित सादर करणेबाबत सर्व प्रभाग अधिकारी यांना कळविले होते. त्याबाबत काय कार्यवाही झाली. या प्रकरणासाठी एक लिमिट ठेवण्यात यावे. वर्षातून दोनदा सभेस समोर अशी प्रमाणे ठेवण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- ज्यांनी शास्तीसह रक्कम भरलेली आहे अशांच्या बाबतीत काय कारवाई करणार.

प्रभाग अधिकारी श्री. तडवी :- गालम यांनी संपूर्ण रक्कम भरली आहे त्यांचे प्रकरण मा.आयुक्त कार्यालयाकडे पाठविण्यांत आले आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- निर्लेखितची प्रकरणे वर्षातून २ वेळा स्थायी समितीकडे सादर करायला पाहिजे.

मा.उपायुक्त श्री. बेहेरे :- ३० तारखेपर्यतची प्रकरणे द्यावीत.प्रलंबित प्रकरणे सादर करणेबाबत प्रभाग अधिकारी १ ते ४ यांची मिटींग घेवून तशा सूचना केलेल्या आहेत कोणाकडे किती प्रकरणे पेंडीग आहे. याबाबत आढावा घेवून मा.स्थायी समितीस अवगत करण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- गालम यांनी पैसे भरले त्याचा निर्णय काय करणार.

मा.उपायुक्त श्री. बेहेरे :- रक्कम जास्त असेल तर परत करू अन्यथा कमी असेल तर समायोजित करण्यात येईल.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-निर्लेखितचे प्रकरण करताना समक्ष जागेवर जावून अधिका-यांनी पाहणी करणे आवश्यक आहे ते करता का ?

प्रभाग अधिकारी क्र.१ ते ४ यांनी त्यांचेकडील प्रलंबित प्रकरणाबाबत माहिती दिली.

मा.उपायुक्त श्री. बेहेरे :- प्रकरणासोबत पाहणी अहवाल असतो पाहणी अहवालावर प्रभाग अभियंता, प्रभाग अधिकारी स्वाक्षरी असते समक्ष पाहणी केल्यानंतरच पाहणी अहवाल सादर करण्यात येतो. येत्या तीन दिवसात चारही प्रभाग अधिकारी यांनी स्थायी समितीकडे सर्व प्रकरणे सादर करावीत. असे आदेश देण्यात येत आहे.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव क्र.४५चा ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- श्री. नारायण मिसाळ यांचे चांगले काम चालू आहे. महाराष्ट्रात प्रसिध्द आहे मोठया शहरात पैसे भरून शिक्षण मिळत नाही इतके चांगले काम आहे. यशदा, चाणक्य मंडळ या ठिकाणी शिक्षण घेणे शक्य होत नाही. त्यांना या ठिकाणी संधी मिळते येत्या महासभेत बोलावून त्यांचा सत्कार करावा. अशी सूचना मांडतो.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. येत्या महासभेत बोलावून त्यांचा सत्कार करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा. येत्या महासभेत बोलावून त्यांचा सत्कार करावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची अहमनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक या पदावर कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती नुसार जा.क्र.आस्था./कंत्राटी नेमणूक २७३७ दिनांक ११/७/२०१४ अन्वये दिनांक १९/३/२०१४ पासून सहा महिन्याकरिता दरमहा रूपये २०,०००/- (वीस हजार ) या मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर. येत्या महासभेत बोलावून श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांचा सत्कार करावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.अजिंक्य बोरकर सही/-

अनुमोदक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-५**

विषय क्रमांक- ४६ बुधवार दिनांक ६/८/२०१४

ठराव क्रमांक- ४६ बुधवार दिनांक ६/८/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती ठराव क्र.३ दि.२/६/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे अमरधाम कंपौड लगत गाळा क्र.१५ लगची खुली जागा क्र.१४ वर खुल्या जमिनीचे क्षेत्र १०x१४=१४० चौ. फुट खुली जागा अर्जदार श्री. अजय भिमराज चितळे यांचेऐवजी त्यांचे वडील श्री. भिमराज आनंदाराव चितळे यांना १ वर्षे भाडेकराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन देणेबाबत फेरसादर.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग

विनंतीपुर्वक रिपोर्ट देण्यांत येतो की, श्री. अजय भिमराज चितळे यांना अमरधाम कंपौडलगत खुली जागा नं.१४ दरमहा भाडे रू.५००/- अनामत रक्कम रू.३०,०००/- घेउन एक वर्ष कराराने देणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविला होता.

मा.स्थायी समिती सभा क्र.२ ठराव क्र.३ दि.२/६/२०१४ अन्वये अ. नगर मनपाचे अमरधाम कंपौंडलगत क्र.१५ जवळील खुली जागा क्र.१४ वर खुल्या जमिनीचे क्षेत्र १०x१४= १४० चौ.फुट खुली जागा अर्जदार श्री. अजय भिमराज चितळे यांना १ वर्ष भाडेकराराने दरमहा भाडे रू.६००/- व अनामत रक्कम रू.३०,०००/- घेउन देणेबाबत असलेला ऑफिस रिपोर्ट आणि अर्जदार यांनी गाळाधारकांचे नाव बदलण्याबाबत सादर केलेल्या अर्जानुसार सभेत कार्यवाही करता येणार नाही. त्यामुळे मार्केट विभागाकडे प्रस्ताव पुन्हा पाठवुन अर्जदार यांच्या अर्जावर नियमानुसार कार्यवाही करून फेरसादर करावे असा ठराव पारित झालेला आहे.

मा.नगररचनाकार यांनी सदर जा.क्र./टी.पी./६९३३ दि.२२/८/२०१३ अन्वये दरमहा भाडे रू.६००/- व अनामत रक्कम रू.३००००/- इतके एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रमाणीत केलेले आहे.

तरी मा.स्थायी समिती सभा क्र.२ ठराव क्र.३ दि.२/६/२०१४ अन्वये अमरधाम कंपौंडलगत खुली जागा क्र.१४ (१०x१४=१४० चौ. फु. खुली जागा) श्री. अजय भिमराज चितळे यांचेऐवजी त्यांचे वडील भिमराज आनंदराव चितळे यांना दरमहा भाडे रू.६००/- अनामत रक्कम रू.३००००/- घेउन एक वर्ष कराराने देणेबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव मा.स्थायी समितीपुढे घेणेबाबत आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, १] जागा भाडे व डिपॉझीट चालू रेडी रेकनर नुसार ठरवून घेणे योग्य , २] यापूर्वी दि.४/७/२००२ रोजी भाडे रू.१२००/- दरमहा लिहिले होते. तत्कालीन अध्यक्षांच्या त्यावर स्वाक्षरी आहे. खुलाशावर मुद्दा क्र.१ बाबत खुलासा

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय की, सादर १] खुल्या जागेचे क्षेत्र १४०.०० चौ. फुट म्हणजेच १३.०१ चौ.मी. , २] सन २०१४ प्रमाणे सदर जागेचा रेडी रेकनर प्रमाणे दर रू.५३००/- प्रती चौ.मी. , ३] जमिनीचे मुल्य = १३.०१ चौ.मी. x ५३०० = रू.६८,९५३/- सदर मुल्यावर मनपास साधारणपणे १२% इतके वार्षिक उत्पन्न मिळणे आवश्यक आहे. वार्षिक उत्पन्न = ६८,९५३/- x १२% = ८२७५/- ,दरमहा भाडे = रू.७००/- दरमहाभाडे घेणे योग्य होईल. व जमीन मुल्याच्या ५०% इतके डिपॉझीट म्हणजेच रू.३५,०००/- इतके डिपॉझीट घेणे योग्य होईल. **/अ**

यावर उपायुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केल्यानुसार व नगररचनाकार यांचे उपरोक्त **"अ"** प्रमाणेचे अभिप्रायानुसार विषयांकित प्रकरण मंजूरीस्तव मा.स्थायी समिती सभेत सादर करणे उचित होईल. असे मत आहे. मे.आदेशार्थ सविनय सादर.

यावर आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अमरधाम कंपौड लगत गाळा क्र.१५ लगची खुली जागा क्र.१४ वर खुली जागा अर्जदार श्री. अजय भिमराज चितळे यांचेऐवजी त्यांचे वडील श्री. भिमराज आनंदाराव चितळे यांना भाडेकराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. सचिन जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** फेरसादर ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे अमरधाम कंपौड लगत गाळा क्र.१५ लगतची खुली जागा क्र.१४ वर खुल्या जमिनीचे क्षेत्र १०x१४=१४० चौ. फुट खुली जागा अर्जदार श्री. अजय भिमराज चितळे यांचेऐवजी त्यांचे वडील श्री. भिमराज आनंदाराव चितळे यांना १ वर्षे भाडेकराराने दरमहा भाडे रूपये ७००/- व अनामत रक्कम रूपये ३५,०००/- घेउन देण्यांत यावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-५**

विषय क्रमांक- ४७ बुधवार दिनांक ६/८/२०१४

ठराव क्रमांक- ४७ बुधवार दिनांक ६/८/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती ठराव क्र.४३ दि.८/७/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं. ३४ पैकी येथील कचरा डेपो या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्तीबाबत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग

संदर्भ :- मा.सभापती स्थायी समिती यांचे दिनांक ३०/७/२०१४ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ पैकी येथील कचरा डेपो या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्ती बाबत मा.स्थायी समितीने सभा क्र.२ विषय क्र.१३ दिनांक ०२/०६/२०१४ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित केला आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ पैकी येथील कचरा डेपो या ठिकाणी जमा असलेल्या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्तीबाबत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट बाबत ऑफिस रिपोर्टावर झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

वाटाघाटी स्थायी समिती समोर करा व याकरीता पुढील सभेमध्ये हा विषय घेईल त्या दिवशी समक्ष वाटाघाटी करण्याकरीता प्रकल्प विभागाने समितीच्या सभेमध्ये संबंधित एजन्सीला उपस्थित ठेवण्याची व्यवस्था करावी. तोपर्यत हा विषय तहकुब ठेवण्यात येत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सदरबाबत मा. **NATIONAL GREEN TRIBUNAL,WESTERL ZONE BENCH, PUNE** येथे **APPLICATION NO. 9 (THC)/2013(WZ)** अन्वये श्री. भाउसाहेब भिमाजी कुलट व इतर यांनी दावा दाखल केला आहे. मे. कोर्टाने खत निर्मिती प्रकल्प उभारणे व प्रत्यक्ष खत निर्मितीस सुरूवात करणे करीता ३ महिन्याची मुदत दिली असल्याने याबाबत मा.सभापती स्थायी समिती यांना दि.२४/०६/२०१४ व दि.३०/६/२०१४ अन्वये तातडीने निर्णय घेणेबाबत पत्र देण्यांत आले.

त्यानुसार मा.स्थायी समितीने सभा क्र.४ विषय क्र.४३ दिनांक ०८/०७/२०१४ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित केला आहे.

**ठराव :-** मा.स्थायी समिती ठराव क्र.१३ दि.२/६/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं. ३४ पैकी येथील कचरा डेपो या ठिकाणी जमा असलेल्या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्तीबाबत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट बाबत सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, जेथे या ठेकेदारांचे प्रकल्प चालू आहेत तेथे जाउन पाहणी करण्यात येईल.चर्चा करू.प्रशासनाने ठरवलेले दर ठेकेदारास मान्य असल्याने प्रकल्पांची पाहणी करून पुढील सभेत निर्णय घेण्यात येईल.नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

तसेच खत प्रकल्पाकरीता आवश्यक असणा-या स्थापत्य कामांबाबत २.२१ कोटी रक्कमेची ई - निविदा मागविण्यांत आलेली आहे. सदर निविदेस ३ वेळेस मुदतवाढ देवुनही पुरेशा प्रमाणात प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. सदरचे स्थापत्य कामे हे मागविण्यात आलेल्या Expression of interest च्या तंत्रज्ञानाशी निगडीत आहेत त्यामुळे खत निर्मिती प्रकल्पाकरीता यंत्र सामुग्री बसविणे, खत निर्मिती प्रकल्पाचे Operation and Mentainence बाबत प्राप्त दराबाबत निर्णय घेणेस्तव व त्याशी निगडीत असलेल्या कामांबाबत निर्णय घेणेस्तव प्रस्ताव मा. स्थायी समितीकडेस सादर करणे उचित वाटते.

सदर बाबत मा.सभापती स्थायी समिती यांनी संदर्भिय पत्राद्वारे कच-याची विल्हेवाट लावणेकरीता एजन्सी नियुक्ती बाबत प्रस्ताव पुनश्च: मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत कळविले आहे.

तरी अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगाव स.नं.३४ येथील कचरा डेपोच्या ठिकाणी दैनंदिन साठवणुक करण्यात येणा-या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्ती बाबत निर्णय घेणेस्तव प्रस्ताव पुनश्च: मा. स्थायी समितीकडे सादर करणे बाबत सविनय सादर./**अ**

येणेप्रमाणे प्रकल्प अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता रजेवर

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केलेनुसार **"अ"** प्रमाणे प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेत सादर करणेबाबत आदेशार्थ सविनय सादर.

यावर आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सदर बाबत मा.NATIONAL GREEN TRIBUNAL यांनी अत्यंत नाराजी व्यक्त केली असलेने याबाबत तातडीने निर्णय मा. स्थायी समितीने घेणे अत्यावश्यक आहे. याबाबत मा.सभापती, स्थायी समिती यांना अवगत करावे.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- बुरूडगांव स.नं.३४ पैकी येथील कचरा डेपो या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्ती विषयी प्रस्ताव आहे. ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- मागील बैठकीमध्ये श्रीवर्धन व बार्शी येथील संबंधीत एजन्सीचे प्रकल्प पाहणीबाबत समक्ष पाहणी करण्याबाबत ठरले होते. श्रीवर्धनचा प्रकल्प सुरू झालेला नाही. मेहेत्रे साहेब बार्शीचा प्रकल्प अभियंता,शहर अभियंता व तुम्ही पाहिला का. त्याचा पाहणी अहवाल वाचून दाखवा.

प्रकल्प अभियंता श्री. मेहेत्रे :- विषय- पार्श्व एन्टरप्राईजेस चिंचवड पुणे यांनी बार्शी नगरपरीषद येथे घन कच-यापासुन खत निर्मिती बाबत उभारलेल्या ३० मेट्रीकटन क्षमतेच्या प्रकल्पाची दि.३०/०४/२०१४ रोजी केलेल्या पहाणी बाबत अहवाल सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिकेने बुरुडग़ाव स. नं. ३४ येथे शहरात निर्माण होणा-या अंदाजे १२५ मेट्रीनटन प्रतीदिन घनकच-यावर प्रक्रिया व विल्हेवाट करणे करीता Online Expression of Interest मागविण्यात आले होते. यामध्ये मनपास केवळ एकच प्रस्ताव प्राप्त झाला पार्श्व एन्टरपाईजेस चिंचवड पुणे या एजन्सीने त्यांनी सादर केलेल्या Expression of Interest मध्ये बार्शी नगरपरीषद येथे ३० मेट्रीकटन क्षमतेचे थ्रेस स्क्रिनिंग मशीनचा पुरवठा करणे, उभारणी करणे त्याव्दारे खत निर्मिती करणे व त्याची विक्री करणे तसेच विघटित कच-यांची विल्हेवाट लावणे इत्यादी प्रकल्प ५ वर्षापर्यंत स्वखर्चाने चालविणे. सदर बाबत मा. महापौर, मा.आयुक्त व मा. सभापती स्थायी समिती यांनी सदरचा प्रकल्पाची समक्ष पहाणी करुन तसा अहवाल सादर करणे बाबत सुचना दिल्या. त्यानुसार दि. ३०/०४/२०१४ रोजी मा.शहर अभियंता

व प्रकल्प अभियंता यांनी पाश्र्व एन्टरपाईजेस चिंचवड पुणे याचे प्रतिनिधी श्री नितीन बोरा यांचे समवेत बार्शी नगरपरीषद येथील घनकच-यापासुन खत निर्मिती प्रकल्पाची पहाणी केली. सदर ठिकाणी खालील मुद्दे निदर्शनास आले.

**मुद्दा क्र.-१ कच-याचे वर्गीकरण--**

पाश्र्व एन्टरपाईजेस चिंचवड पुणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये Separation machine चा उल्लेख केलेला आहे. परंतु प्रत्यक्ष बार्शी येथील प्रकल्पावर मनुष्य बळाव्दारे कच-याचे काही प्रमाणात वर्गीकरण करण्यात येत होते. याकरीता कुठल्याही यंत्र सामुग्रीचा वापर करण्यात येत नाही. तसेच कच-याचे वर्गीकरण करीता वेगळे बांधकाम करण्यात आलेले नाही.

**मुद्दा क्र.२ Receiving plat form--**

पाश्र्व एन्टरपाईजेस चिंचवड पुणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये Receiving plat form दर्शविण्यात आले आहे परंतु बार्शी येथील प्रकल्पावर कुठल्याही प्रकारचे Receiving plat form बांधकाम करण्यात आलेले नाही. आलेला कचरा हा एकाच शेडमध्ये स्विकारण्यात येते.

**मुद्दा क्र. ३ Windro plat form --**

पाश्र्व एन्टरपाईजेस चिंचवड पुणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये Windro plat form दर्शविण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्ष बार्शी येथील प्रकल्पावर Windro plat form अस्तित्वात नाही.

**मुद्दा क्र.४ Lecheat tank --**

पाश्र्व एन्टरपाईजेस चिंचवड पुणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये Lecheat tank दर्शविण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्ष बार्शी येथील प्रकल्पावर Lecheat tank अस्तित्वात नाही.

**मुद्दा क्र.५ Weigh bridge --**

पाश्र्व एन्टरपाईजेस चिंचवड पुणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये Weigh bridge दर्शविण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्ष बार्शी येथील प्रकल्पावर Weigh bridge अस्तित्वात नाही.

तसेच दि.३०/०४/२०१४ रोजी प्रकल्प चालू स्थितीत नव्हता. सदर ठिकाणी अंदाजे १० ते १५ मेट्रीकटन कच-याची साठवणूक करण्यात आली होती व अंदाजे १० मेट्रीकटन कच-यावर प्रक्रिया करुन खत निर्मिती करण्यात आली होती. सोबत छायाचित्र जोडले आहेत. प्रकल्प चालू नसले बाबत संबधित ठेकेदारास विचारणा केली असता त्यांनी प्रकल्पाच्या ठिकाणी विज पुरवठ्यामध्ये तांत्रिक बिघाड झ ााल्यामुळे प्रकल्प बंद असल्याचे सांगितले बार्शी नगरपरीषद मार्फत पाश्र्व एन्टरपाईजेस चिंचवड पुणे यांना प्रकल्प चालविणे करीता कुठल्याही प्रकारचे Operataion and Mentaience Charges देण्यात येणार नसल्याचे बार्शी नगरपरीषद येथील प्रकल्पाचे काम पहाणारे संबंधित अधिकारी श्री पांडे यांनी माहिती दिली. सदरच्या प्रकल्पाचे स्थापत्य कामे (बांधकाम) हे बार्शी नगरपरीषदेने केले आहे. पाश्र्व एन्टरपाईजेस चिंचवड पुणे यांनी प्रकल्पासाठी आवश्यक असणारी मशिनरी पुरविणे, Install करणे व ५ वर्षा करीता स्वखर्चाने प्रकल्प चालविणे असे त्यांचे Scope of work मध्ये आहे.

तरी बार्शी नगरपरीषद येथील खत निर्मिती प्रकल्पाचा दि.३०/०४/२०१४ रोजी मा.शहर अभियंता व प्रकल्प अभियंता यांचे समवेत केलेल्या पहाणी बाबतचा अहवाल माहितीस्तव सविनय सादर.

मा.सभापती साहेब :- तुम्ही ज्यावेळेस बार्शी येथे गेला होता त्यावेळेस तेथील प्रकल्प चालू होता का?.

प्रकल्प अभियंता श्री.मेहेत्रे :- त्यांनी आम्हाला डेमो दाखविला. प्रकल्पाचे उद्घाटन झालेले नव्हते.

मा.श्री.सचिन जाधव :- १० जुलै च्या आसपास मा.आयुक्त साो यांचेकडेस काही एजन्सीज या संदर्भात आल्या होत्या काय याबाबत माहिती द्यावी.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :-अशी एजन्सी चर्चेसाठी आली होती. त्यांना लेखी प्रस्ताव देण्याचे सांगीतले होते.परंतू त्यांनी तसा प्रस्ताव दिला नाही.तो एनर्जी जनरेशन चा प्रकल्प होता. यासाठी बी.ओ.टी.तत्वावर साधारण २५ ते३० कोटी रूपये खर्च येतो. महानगरपालिकेने यासाठी ५ कोटी रूपये द्यावेत अशी अपेक्षा होती.

मा.श्री.सचिन जाधव :- ही जी कंपनी आहे त्यांचे पुणे,महाड,कोल्हापूर व हैदराबाद याठिकाणी चांगले प्रोजेक्टस चालू आहेत.

मा.श्री.संपत बारस्कर :- परंतू त्यांनी लेखी प्रस्ताव दिला नाही.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आपल्याकडे किती टन कचरा रोज जमा होतो.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- किमान मे. १२५ टन जमा होतो.

मा.सभापती साहेब :- गेल्या ३-४ वर्षांपासून कचरा डेपोवर कचरा पडून आहे. तोही वापरात येईल.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे - अधिका-यांनी बार्शीच्या प्रकल्पाची समक्ष पहाणी केली आहे. परंतू या एजन्सीचे ब-याच ठिकाणी कोर्ट केसेस चालू आहेत. त्यामुळे येथेही ही एजन्सी कोणत्याना कोणत्या कारणाने कोर्ट केस चालू करील व त्यामुळे प्रकल्प अडचणीत येईल, म्हणून या एजन्सीचे टेंडर रद्द करून नवीन टेंडर मागवा. त्यात विज निर्मीती, खतप्रकल्प,गांडूळ खत प्रकल्प इ.करणा-यांचा समावेश करण्यात यावा.

मा.श्री.दिप चव्हाण :-आज सभागृहात नवीन अधिकारी उपस्थित असल्याचे दिसते,त्यांनी आपली ओळख सभागृहाला करून द्यावी.

यानंतर मा.श्री.हितेश विसपूते, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी त्यांचा परिचय सभागृहास करून दिला.

मा.श्री.दिप चव्हाण :- महानगरपालिकेचा कारभार हा अकाउंट कोड नुसार व कायद्याप्रमाणे चालावा एवढीच आमची आपल्या कडून अपेक्षा आहे. आता जो ऑफीस रिपोर्ट वाचून दाखवला,त्याला स्वतःचा अनुभव नाही, त्याचा कोठेही प्रोजेक्ट चालू नाही, या दृष्टिकोनातून ऑफीसचे काय मत आहे. त्याने ३२५ हा दर दिलेला होता.तसेच रू.३११ मध्ये ही तयार नव्हता. परंतू सभेत अचानक कमी करून २२५ मध्ये काम करण्यास त्याने तयारी दर्शविली त्यामुळे आमच्या मनात शंका आली. श्रीवर्धन,बार्शी याठिकाणी प्रकल्प चालू असल्याबाबत माहिती दिली. पुर्वी ट्रायल दिली असे सांगीतले व आता डेमो दाखविला असे अधिका-याने सांगीतले.आता उद्घाटन झाले नाही असे सांगीतले.म्हणजेच प्रकल्प सुरू नाही. जर त्याला अनूभव नसेल, त्यानें सांगीतल्या प्रमाणे प्रकल्प चालवु शकत नसेल तर जनतेच्या

पैशाचा अपव्यय होणार आहे. ग्रीन टायब्युनल ने दिलेल्या आदेशांचा स्थायी समिती आदर करते परंतू मा.ट्रायब्युनलच्या निदर्शनास रेट व इतर वस्तुस्थिती निदर्शनास आणून द्यावी. अशा अडचणी आल्यानंतर स्थायी समितीने काय निर्णय घ्यावयाचा हा प्रश्न आहे. अजून चांगल्या संस्था जर येत असतील तर त्यांना संधी द्यावी व जनतेच्या व महानगरपालिकेच्या हिताचा निर्णय घ्यावा. जर याबाबत घाईने निर्णय घेतल्यास व तो चुकीचा ठरल्यास स्थायी समिती वर जबाबदारी निश्चित होउ शकते याकरीता एजन्सी ची व इतर सर्व बाबी तपासून घ्या. स्थायी समिती निर्णय घेत नाही अशी चुकीची माहिती कोर्टाला देउ नये. ही परिस्थिती पहाता सदर एजन्सी काम करण्यास सक्षम नाही असे स्पष्ट दिसते. ज्यामध्ये महानगरपालिकेचा फायदा होईल त्यांना काम देण्यात यावे. तोंडी चर्चे मध्ये या एजन्सीने काही अटी घातल्याचे समजते ते खरे आहे का. १३व्या वित्त आयोगातून सदर कामाचे पेमेंट करावे अशी त्याने मागणी केली हे खरे आहे काय याबाबत माहिती द्यावी.

प्रकल्प अभियंता श्री.मेहेत्रे :- मा.सभापती यांचे समोर बोलताना त्यांनी सदर मागणी केली होती.

मा.श्री.दीप चव्हाण :- म्हणजे त्याला आमच्या पालिकेच्या पैशावर विश्वास नाही. कशाच्या आधारे १३ व्या वित्त आयोगातून पेमेंट करण्याबाबतची तो मागणी करतो. याचाच अर्थ त्याची काम करण्याची मानसीकता नाही. मा.ट्रायब्युनलच्या आदेशाचे आम्ही पालन करणार याचा अर्थ असा नाही की, कायदा बाजूला ठेवून निर्णय घ्यावायाचा.त्याचे संदर्भात इतर मनपा.तील कोर्ट केसेस संदर्भात माहिती दावी.

प्रकल्प अभियंता श्री.मेहेत्रे :- आपल्याकडे त्यांच्या कोर्ट केसेस बाबत रेकॉर्ड नाही.

मा.श्री.दीप चव्हाण :- अशाच प्रकारे टेंडर घेउन ५ ते ६ मनपां विरूध्द सदर एजन्सी कोर्टात गेली आहे.तो अशा प्रकारे लीटिगेट करतो. त्याला कुठल्याही प्रकारचा अनुभव नाही. चर्चा करायला श्री.काळे येतात व सभेसमोर श्री.बोरा येतात. नेमके प्रतिनिधी कोण हे समजत नाही. सदरचे टेंडर या कंपनीला देउ नये. पुढे लिटीगेट केले गेले तर आमची जबाबदारी राहणार नाही. तो सगळा बेकायदेशीर आहे. कायद्याच्या प्रत्येक बाबी तपासून घ्या. स्थायी समिती निर्णय घेत नाही अशी चुकीची माहिती कोर्टाला देउ नये. ही परिस्थिती पहाता सदर एजन्सी काम करण्यास सक्षम नाही असे स्पष्ट दिसते. ज्यामध्ये महानगरपालिकेचा फायदा होईल त्यांना काम देण्यात यावे.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- यापुर्वी आपण ५-ते ६ वेळा याकामासाठी टेंडर मागविले परंतू कोणीही टेंडर भरले नाही. कच-यावर प्रक्रीया करणारी मशीनरी पार्श्व एंटरप्राईझेस उभारणार होती. त्यानंतर कच-यावर प्रोसेसींग करून खत तयार करणार होते. पर्यावरणाला हानी पोहोचू नये व कच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याकरीता हे प्रकल्प राबवावे लागतात. यातून नफा किंवा रॉयल्टी मिळणे अपेक्षीत नसते.

मा.श्री.दिप चव्हाण :- यापुर्वी अशाच एका एजन्सी ने प्रकल्पात रू.५५लाखची गुंतवणूक केली व ते सोडून गेले असे उदाहरण आहे. हे सुध्दा मोठे गुढ आहे. कागदावर सुंदर योजना मांडण्यात येते परंतू प्रॅक्टीकल त्याप्रमाणे कामे होत नाहीत. सभापतीसाहेब,आमचे मुद्दे जे आम्ही मांडले ते उपलब्ध कागदपत्र व ऑफीस रिपोर्ट वरून मांडले आहेत. निर्णय घेण्याचा तुमचा अधिकार आहे. तो तुम्ही घ्यावा.

मा.सभापती साहेब :-आता आपण खत निर्मीत प्रकल्पा बाबत चर्चा करत आहोत.यापुर्वीच्या सभेत बार्शी येथील प्रकल्पाची समक्ष पहाणी केल्यानंतर निर्णय घेण्याबाबत चर्चा झाली होती. श्रीवर्धनचा यांचा प्रकल्प सुरूच झालेला नाही.बार्शी येथे स्थायी समिती सदस्यांनी जाउन समक्ष पहाणी करण्यापुर्वी प्रभारी शहर अभियंता श्री.मगर व श्री.मेहेत्रे यांनी प्रकल्पास भेट दिली व पहाणी केली त्यावेळी प्रकल्प बंद होता. ते गेल्यानंतर प्रोजेक्ट चालू करून दाखवला. मुळात बार्शी येथील प्रकल्प ३०मे.टन प्रती दिन क्षमतेचा आहे. आपला प्रकल्प १२५ मे.टन चा आहे. एवढा मोठा प्रोजेक्ट चालू करावयाचा याकरीता त्याला बोलावून घ्या. सदस्यांनी ज्या शंका उपस्थित केल्या त्याचा खूलासा त्याला करायला लावा, तोपर्यंत अर्ध्या तासाकरीता सभा तहकूब करण्यात येत आहे. वेळ दु.१२-५०.

दु.१-२०वा सभा पुन्हा सुरू.

प्रकल्प अभियंता श्री.मेहेत्रे :- संबंधीत एजन्सीचे मालक यांना स्थायी समिती मध्ये उपस्थित राहणे करीता ४ वेळा भ्रमण ध्वनी व्दारे संपर्क करण्याचा प्रयत्न केला आहे.

मा.श्री.दीप चव्हाण:- आपल्या संबंधीत इंजिनीयर ने ४वेळा संबंधीतांशी उपस्थित राहणे बाबत संपर्क केला परंतू त्यांनी प्रतिसाद दिलेला नाही. याचा अर्थ त्यांची काम करण्याची इच्छा नाही. हा विषय तातडीचा असल्याने मा.ग्रीन ट्रायब्यूनल निर्देश देत असल्याने नव्याने टेंडर कॉल करावे. जो कोणी काम करण्यास तयार असेल त्याला देण्यात यावे.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- आपल्याकडे जी एजन्सी आली आहे त्याला मान्यता देण्यात यावी.त्याचे जे पेमेंट संदर्भात अटी शर्ती असतील तर त्या त्याच्याशी स्थायी समिती संबंधीत नाही. तरी याबाबत निर्णय घेण्यात यावा. तेथील जनतेचा पाठपुरावा चालू आहे. तसेच कोर्ट मॅटर ही चालू आहे.

मा.सभापती साहेब :- त्याला बोलावून ही तो येत नाही.

मा.श्री.दीप चव्हाण :-नैसर्गीक न्याय तत्वानुसार आपण त्याला संधी दिली आहे.म्हणून मा.सभापतींना विनंती की,पुढील कार्यवाही तातडीने करावी.

मा.श्री.अजिंक्य बोरकर:- आपण त्यांचेकरीता वेळ देतो,मिटींग बोलावतो,त्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

मा.सभापती साहेब :- आता आपण अर्ध्या तसासाठी सभा तहकूब केली होती. ज्या एजन्सीने प्रस्ताव दिला होता,त्यांनी यावेळेत स्थायी समिती समोर उपस्थित राहणे आवश्यक होते. परंतू ते उपस्थित झाले नाहीत. याचा अर्थ ते काम करण्यास केपेबल नाही असे दिसते. बार्शी येथील ३० मे.ट.प्र.दि.चे काम चालू आहे का नाही हे ही दिसत नाही.

या एजन्सीचे श्रीवर्धन येथील काम सुरू नाही. सदस्यांच्या ज्या शंका आहेत त्याचे उत्तर देण्यासाठी त्याने इथे येणे अपेक्षीत होते. परंतू अद्याप तो आलेला नाही. दि.८/८/१४ रोजीच्या कोर्टा च्या निदर्शनास या सर्व गोष्टी आणा.आज एवढा मोठा प्रकल्प उभा राहवयाचा आहे. पुर्वी च्या प्रकल्पा सारखी याची अवस्था व्हायला नको म्हणून आम्ही त्याला संधी देतो. आता उर्वरीत मागण्या करण उचित नाही. ज्या वेळी प्रस्ताव सादर केला त्यावेळी त्याने त्या मांडायला पाहिजे होत्या.

संबंधीत एजन्सीचे श्री.बोरा हे दु.१-३० वाजता मा.स्थायी समिती समोर उपस्थित झाले.

मा.श्री.दिप चव्हाण :- आपण श्रीवर्धनचा प्रकल्प चालू आहे अशी माहिती दिली.

एजन्सी श्री.बोरा :- श्रीवर्धन चा प्रकल्प अद्याप चालू नाही. बार्शीत प्रोजेक्ट चालू आहे. ३५ ते४० मे.टन चा प्रकल्प आहे. काम चालूसुरू असून प्रकल्प सुरळीतपणे चालू आहे. याबाबत नगरपरिषदे कडे शहानिशा होउ शकते.

मा.श्री.दीप चव्हाण :- तुमचे कोर्ट मॅटर्स चालू आहेत का. तुमच्या एजन्सीचे रजिस्ट्रेशन कोणत्या नावाने आहे. प्रोप्रायटर कोण आहे.एजन्सीचा पत्ता याबाबत माहिती द्या. तुम्ही १३ व्या वित्त आयोगातून पेमेंट मिळावे अशी मागणी केली आहे.

एजन्सी श्री.बोरा - एजन्सीचे नाव पार्श्व एंटरप्राईझेस असून मी स्वत: मालक आहे.चिंचवड येथे ऑफीस आहे. आम्ही काम केल्यानंतर आम्हाला पेमेंट मिळाले पाहीजे याची खात्री मिळावी याकरीता चौकशी केली आहे. कुठल्याही नगरपरिषदेकडे पेमेंट संदर्भात आम्ही चौकशी करतो.

मा.श्री.दीप चव्हाण :- १३व्या वित्त आयोग वा अन्य निधीतून कामाचे पेमेंट करण्यासंदर्भात ठराव करण्याचा स्थायी समितीलिा अधिकार नाही. टेंडर प्रसिध्द करताना बजेट प्रोव्हीजन पाहूनच टेंडर करण्यात येते.

मा.सभापती साहेब :- आता आपण गेलात तरी चालेल. बार्शीच्या प्रकल्पा संदर्भात आत्ताच उपायुक्त बेहेरे साहेब यांनी तेथील मुख्याधिकारी यांचेशी भ्रमणध्वनीव्दारे चर्चा केली त्याबाबत माहिती द्यावी.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- या चर्चेच्या अनुशंगाने मी श्री.लांडगे,मुख्याधिकारी,बार्शी न.प.यांचेशी बोललो. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार प्रोजेक्ट बांधून पूर्ण झाला असून प्रक्रीया ३ ते४ ट्रॅक्टर कच-यावर प्रक्रीया केली जात आहे. उद्घाटन करण्याचे बाकी आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- हा प्रस्ताव रद्द करून नवीन प्रस्ताव मागवावेत.

मा.श्री.शेख फैयाज अजिजोद्दीन :- नवीन प्रस्ताव मागवा.

मा.सभापती साहेब :- बेहेरे साहेब बार्शी येथील मुख्याधिका-यांशी बोलले,तेथे फक्त ३ ते४ ट्रॅक्टर कच-यावर प्रक्रीया होत असून पूर्ण क्षमतेने प्रकल्प चालू झालेला नाही. तेथे जर फक्त ४ टन कच-यावर प्रक्रीया होत असेल तर आपल्या येथील १२५ टन कच-याची विल्हेवाट कशी लावू शकतो. एवढे दिवस गेले,याबाबत कोर्टाला सर्व वस्तूस्थिती सांगा. पार्श्व एंटरप्राईझेस यांचा बार्शी नगरपरिषद येथील ३०मे.टन प्रती दिन क्षमतेचा कचरा प्रक्रीया प्रकल्प अद्याप पर्यंत कार्यान्वीत झालेला नाही असे निदर्शनास आले आहे.तसेच यांचा अन्य प्रकल्प कोठेही सुरू नाही ,त्यामुळे या एजन्सीला अशा प्रकारच्या कामाचा विस्तृत अनुभव नाही असेही निदर्शनास येते.तसेच अहमदनगर महानगरपालिकेचा नियोजीत खत प्रकल्प प्रती दिन १२५ मे.टन प्रती दिन क्षमतेचा आहे,त्यामुळे नगरला इतक्या मोठया प्रमाणात प्रकल्प सदरची एजन्सी उभारून चालवू शकणार नाही. त्यामुळे पार्श्व एंटरप्राईझेस यांचा कच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रीया व विल्हेवाट करणे कामी प्राप्त झालेला एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट रद्द करावा,आणी याकामी नव्याने स्थापत्य कामासहीत अल्प मुदतीचे एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट त्वरीत मागविण्यात यावे. तसेच हा ठराव मा.राष्ट्रीय हरीत लवाद यांचे निदर्शनास आणून देण्यात यावा.

**ठराव :-** मा.स्थायी समिती ठराव क्र.४३ दि.८/७/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं. ३४ पैकी येथील कचरा डेपो या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्तीबाबत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट बाबतचा ऑफिस रिपोर्ट तसेच मा.स्थायी समिती मध्ये झालेल्या चर्चे नुसार ठराव करण्यात येतो की, पार्श्व एंटरप्राईझेस यांचा बार्शी नगरपरिषद येथील ३०मे.टन प्रती दिन क्षमतेचा कचरा प्रक्रीया प्रकल्प अद्याप पर्यंत कार्यान्वीत झालेला नाही असे निदर्शनास आले आहे.तसेच यांचा अन्य प्रकल्प कोठेही सुरू नाही ,त्यामुळे या एजन्सीला अशा प्रकारच्या कामाचा विस्तृत अनुभव नाही असेही निदर्शनास येते.तसेच अहमदनगर महानगरपालिकेचा नियोजीत खत प्रकल्प प्रती दिन १२५ मे.टन प्रती दिन क्षमतेचा आहे,त्यामुळे इतक्या मोठया प्रमाणात प्रकल्प सदरची एजन्सी उभारून चालवू शकणार नाही. सबब पार्श्व एंटरप्राईझेस यांचा कच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रीया व विल्हेवाट करणे कामी प्राप्त झालेला एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट रद्द करण्यात येत आहे,व याकामी नव्याने स्थापत्य कामासहीत अल्प मुदतीचे एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट त्वरीत मागविण्यात यावे. सदरचा ठराव मा.राष्ट्रीय हरीत लवाद यांचे निदर्शनास आणून देण्यात यावा. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक - मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक - मा.श्री.शेख फैयाज अजिजोद्दीन. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका